**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मुरलीधर मारुती कदम
१४०, शुक्रवार पेठ, कराड,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
कराड नगर परिषद,
कराड, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
कराड नगर परिषद,
कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०३/२०१०/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) नगर परिषदेने जा.क्र./बांध/७२१२ दि.३१/१२/२००३ हे कोणत्या नियमाने, अधिकाराने व कायद्याने दिले याबाबतचा पुरावा<br>२) नगर परिषदेचे नियम सर्वांना समान असताना केवळ मलाच कोणत्या नियम व कायद्याने संमत्तीपत्र मागितले याबाबतचा खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मुरलीधर मारुती कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुबोध गोपाळ भोकरे
भोकरे वाडा, ब्राम्हणपुरी, मिरज, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
लेखा व कोषागारे, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
लेखा व कोषागारे, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे श्री.बा.बा.थिटे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
लेखा व कोषागारे, पुणे श्री.सं.चं.देसाई

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.११.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.११.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२५.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सुबोध गोपाळ भोकरे यांनी मागितलेली माहिती आपल्या कार्यालयाकडील नसल्यामुळे विहित मुदतीत त्यांना तसे कळविले. काही कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके, वेतन पडताळणी, पदोन्नतीची छाननी आदी बाबी आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील नाहीत व त्यामुळे त्यांची माहिती संबधित कार्यालयाकडूनच अपीलकर्त्याने घेणे आवश्यक आहे, तसे त्यांना कळविले. मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे श्री.भोकरे यांची वेतनवाढ रोखून ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली असून त्यामुळे त्या संदर्भात स्पष्टीकरण, खुलासा, अभिप्राय याची मागणी करणारे व वेतन पडताळणी पथकावर आरोप करणारे अर्ज, अपिले व अन्य पत्रव्यवहार श्री.भोकरे वारंवार करीत असतात. राज्य मुख्य माहिती आयोगाने सन २००६ मध्ये तशा निष्कर्षासह त्यांचे याच स्वरूपाचे अपील फेटाळले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे श्री.सं.च.देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे श्री.बा.बा.थिटे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.भोकरे यांच्या अर्जातील बहुसंख्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहितीच्या व्याख्येत येणारे नाहीत. मात्र संबंधित मुद्दयांच्या अनुषंगाने सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे, असेही श्री.देसाई व श्री.थिटे यांनी नमूद केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.हनुमंत पोपट माने
रंभापुरा, मु.पो.व ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
दि करमाळा अर्बन को-ऑप बँक लि.,
करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२/०९/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३/१०/२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८/११/२००७ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.८/८/२००४ रोजीच्या बैठकातील ठराव नोंदीची प्रत, तसेच दि.३/११/२००५, दि.३/५/२००६, दि.१६/७/२००६ या बैठकीतील अनुक्रमे ठराव क्र.५ व ठराव क्र.१० च्या नकला | |

**विवेचन**

नागरी सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँका यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किसन केशव पाटील
मु.पो.आळते, ता.तासगांव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव,
तहसील कार्यालय, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव,
तहसील कार्यालय, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किसन केशव पाटील
मु.पो.आळते, ता.तासगांव, जि.सांगली

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव, तहसील कार्यालय, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली श्री.रघुनाथ गजानन पोटे |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली.

मृत्यूपत्र प्रकरणी उच्च न्यायालयात आपल्या बाजूने लागलेल्या निकालानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली यांनी दिली नाही. काल्पनिक स्वरूपाचे उत्तर दिले. संबंधित मिळकतीला सरकारचे नाव कमी करून आपल्याला कब्जा मिळावा अशी मागणी आहे. तो कधी मिळणार हे सांगितले जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किसन केशव पाटील यांनी केली.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली आहे. दोन गटांबाबत तक्रार असून वस्तुस्थितीचा पंचनामा करून त्याबाबतचे उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिले आहे. कोर्ट रिसीव्हर नेमून संबंधितांस कब्जा दिला आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली श्री.रघुनाथ भगवान पोटे यांनी केले.

अपीलकर्त्याची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. तथापि मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार

केलेल्या कार्यवाहीचा तपशील अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली यांनी अपीलकर्त्यास एक आठवड्यात कळवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हमीद माणिक शेख
स.नं.३०/७/२, घर नं.२८०,
कृषी पणन सोसायटी समोर,
मु.पो.आंबेगाव, ता.हवेली,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |

**३.** **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हमीद माणिक शेख
स.नं.३०/७/२, घर नं.२८०,
कृषी पणन सोसायटी समोर,
मु.पो.आंबेगाव, ता.हवेली,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे श्री.सचिन इथापे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे श्री.डी.एन.रेडके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.०५.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०७.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सेवानिवृत्तीला ९ वर्षे होऊन गेली तरीही आपल्याला निवृत्तीवेतन व अन्य फायदे योग्य प्रकारे मिळाले नाहीत. उशिरा मिळालेल्या रकमेवर व्याज मिळावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हमीद माणिक शेख यांनी केली.

अपीलकर्ता श्री.शेख यांनी अपील क्र.८१०/पुणे मध्ये हेच मुद्दे मांडले होते. त्याबाबत आयोगाने निर्णय दिला आहे. सेवानिवृत्ती वेतन मिळण्यास विलंब झाल्याची त्यांची मुख्य तक्रार आहे. त्याबाबतचा तपशील वेळोवेळी त्यांना कळविण्यात आला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,भोर तहसील कार्यालय,ता.भोर,जि.पुणे श्री.डी.एन.रेडके व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे श्री.सचिन इथापे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही व अनुषंगिक कार्यवाहीबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे श्री.डी.एन.रेडके व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर तहसील कार्यालय, ता.भोर,जि.पुणे श्री.सचिन इथापे यांनी त्यांना सर्व माहिती दिलेली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी
मु.पो.सोरडी, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी / विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सोरडी, ता.जत.जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी
मु.पो.सोरडी, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी / विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली
श्रीमती अरूणा दत्तात्रय इटाई, श्री.एच.व्ही.कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सोरडी, ता.जत.जि.सांगली

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.५.२०१० रोजी घेण्यात आली.

जमिनीच्या नोंदीत चुकीचे नाव लावले व आपली खरेदी बनावट ठरवून नोंद रद्द केली. ती दुरूस्त करावी] यासाठी वारंवार मागणी करूनही कार्यवाही केली जात नाही व माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी यांनी केली.

अपीलकर्ता या विषयाबाबत वारंवार अर्ज, अपील व अन्य पत्रव्यवहार करीत आले आहेत. याच संदर्भातील त्यांचे अपील क्र.९४० आयोगाने यापूर्वी निकाली काढले आहे. आयोगाने त्या अपिलात दिलेल्या आदेशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेची मोजणी करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. श्री.सिध्दरेड्डी यांच्या विशिष्ट जागेच्या आग्रहामुळे प्रश्न सुटू शकला नाही, असे प्रतिपादन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अरूणा दत्तात्रय इटाई यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाने अपील क्र.९४० मध्ये दिलेला निर्णय या अपिलातही लागू असून पुनः पुन्हा त्याच कारणासाठी अर्ज

व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम याचा अपव्यय करू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ,
डांगे गल्ली, डी-वार्ड,
घर नं.२६४६, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था, इस्लामपूर,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१२/२०१०/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ जोडलेले नाही. सबब सदर अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दैवान गोवर्धन जाधवर
वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य),
तारापोरवाला मत्स्यालय, चर्नीरोड, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, गणेश मच्छिमार सहकारी
संस्था मर्यादित, वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दैवान गोवर्धन जाधवर
वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.७.१०.२००८ रोजी घेण्यात आली.

गणेश मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित, वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर ही संस्था स्थापन झाल्यापासूनी सन १९८२ पासूनची माहिती मागितली असता संस्थेच्या अध्यक्षांनी दिली नाही. संस्थेला शासनाचे अनुदान मिळत नसले तरी सरकारकडून तलावात मासे सोडले जातात, त्यातील पाण्याचे पैसे मिळतात, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दैवान गोवर्धन जाधवर यांनी केले.

अपीलकर्त्याचे निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता संबंधित संस्थेला भरीव शासकीय अनुदान / आर्थिक मदत मिळत असल्याचे दिसत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही, व कायदा संस्थेला लागू ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

11 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुलकरीम महंमदहनीफ बुकसेलर
गर्व्हमेंट कॉलनी, प्लॉट नं.११, कुपवाड रोड,
खतीबनगर, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अब्दुलकरीम महंमदहनीफ बुकसेलर
गर्व्हमेंट कॉलनी, प्लॉट नं.११, कुपवाड रोड, खतीबनगर, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.म.म. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली श्री.व.स.निकम

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.९.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२५.५.२०१० रोजी घेण्यात आली.

मालमत्ता नोंदवहीमध्ये खाडाखोड करून मिळकत धारकाच्या नावात वेगळ्या व्यक्तीची नोंद करण्यात आली. ही खाडाखोड का केली, याबाबतचा खुलासा मागितला असता योग्य माहिती मिळत नाही. मालमत्ता नोंदवहीला टिपणी नसल्याने व सदरची खाडाखोड कोणत्या हक्काने व कोणाच्या सांगण्यावरुन करण्यात आली याचा खुलासा देता येत नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली यांनी दिले. त्यावर अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनी चर्चा करून तो अर्ज निकाली ठेवला व याबाबत वेगळा अर्ज करण्यास सांगितले. तसा अर्ज आपण केला परंतु तीन महिन्याचा कालावधी उलटूनही त्याची दखल घेतली जात नाही. सन १९४३ ते १९६० या काळातील ही घटना असून खाडाखोडीने लिहिलेले नाव रद्द करून पूर्वीप्रमाणे नोंद कायम व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अब्दुलकरीम महंमदहनीफ बुकसेलर यांनी केली.

प्रकरण सुमारे ५० वर्षापूर्वीचे असून अभिलेखातील उपलब्ध कागदपत्रानुसार प्रती व माहिती दिली. अपीलकर्त्याची अन्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली श्री.व.स.निकम यांनी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांच्या सूचनेनुसार अपीलकर्त्याने संबंधित प्रकरणी केलेल्या अपिलाचा निर्णय हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग

असला तरी मूळ अभिलेखातील माहितीच्या अचूकतेच्या दृष्टीने अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनी त्याबाबतचा निर्णय लवकरात लवकर घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) मिळकतधारकांच्या नोंदप्रकरणी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांच्याकडे केलेल्या अपिलावरील कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनी अपीलकर्त्यास दि.१०.७.२०१० पर्यंत देऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर धोंडिबा माने
अकलूज, लोहार गल्ली, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक,
सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक,
सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्री.एम.एन.नेवसे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.५.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.दिनकर धोंडिबा माने यांनी वाटप दरखास्त प्रकरणातील कार्यवाहीची माहिती मागितली होती. संबंधित प्रकरण तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, इंदापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे श्री.माने यांना कळविले. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, इंदापूर व तहसीलदार, इंदापूर यांना माहिती-मागणी अर्जाची प्रत पाठविली व त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. तथापि प्रशासकीय कार्यवाही करण्याची श्री.माने यांची मागणी असून दि.२३.७.२००९ रोजी सहाययक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस, जिल्हा सोलापूर यांच्याकडे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक यांचे प्रतिनिधी श्री.एम.एन.नेवसे यांनी केले. ते लक्षात घेता माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू सुखदेव घोडके
१५८, भारतनगर, कुमठा नाका, टी.व्ही.सेंटरसमोर,
जिल्हा क्रिडा संकुलशेजारी, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू सुखदेव घोडके
१५८, भारतनगर, कुमठा नाका, टी.व्ही.सेंटरसमोर,
जिल्हा क्रिडा संकुलशेजारी, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मोहोळ,
ता.मोहोळ, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.पी.एन.दिक्षित

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ,
ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.पी.एन.दिक्षित

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न देताही शुल्क आकारले व त्यानंतरही अपुरी माहिती दिली. मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती दिली नाही. याबद्दल संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विष्णू सुखदेव घोडके यांनी केली.

कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत पत्र पाठवून योग्य ते शुल्क आकारून दिली. (अर्ज दि.१३.८.२००७, शुल्क कळविले दि.११.९.२००७). मुद्दा क्र.२ मधील ज्ञापनांच्या प्रती अभिलेखात उपलब्ध नाहीत, तसे श्री.घोडके यांना कळविले. तत्कालीन तहसीलदार श्री.एस.एस.सांगडे यांनी मासिक दैनंदिनी दिलेली नसल्यामुळे मुद्दा क्र.२ ची माहिती देता आली नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, तहसील कार्यालय, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.हणमंतराव पाटील यांनी कळविले आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, तहसील कार्यालय, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.पी.एन.दिक्षित यांनी केले.

तत्कालीन तहसीलदार, मोहोळ श्री.एस.एस.सांगडे यांनी मासिक दैनंदिनीबाबतचा खुलासा आठ दिवसात सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आपण मोहोळ येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना नोव्हेंबर, डिसेंबर २००५ व जानेवारी ते मार्च

२००६ या कालावधीतील दैनंदिनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सादर केलेल्या नाहीत, असे तत्कालीन तहसीलदार श्री.एस.एस.सांगडे यांनी दि.५.४.२०१० च्या पत्रान्वये (सध्या तहसीलदार, करमाळा) लेखी कळविल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, तहसील कार्यालय, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी दि.८.४.२०१० च्या पत्रानुसार संबंधित पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले. दैनंदिनी सादर करणे नियमानुसार बंधनकारक असतानाही श्री.सांगडे यानी या सार्वजनिक दस्तऐवजाची पूर्तता का केली नाही याची दखल घेऊन जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. केलेल्या कारवाईबाबत आयोगाला अहवालही सादर करावा.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर व उपलब्ध माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी सार्वजनिक दस्तऐवज असलेल्या दैनंदिनी सादर न करणे हे आवश्यक माहिती उपलब्ध न होण्यास कारणीभूत आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल दि.२५.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

**प्रत::**जिल्हाधिकारी, सोलापूर

२/- तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, तहसील कार्यालय, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एस.एस.सांगडे यांच्यासंदर्भात आदेशातील क्र.२ नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर निवासराव पाटील — अपीलकर्ता
मु.पो.कापूसखेड, ता.वाळवा, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर निवासराव पाटील
मु.पो.कापूसखेड, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.६.२०१० रोजी घेण्यात आली.

वाळवा तालुक्यातील सर्व नागरी बँका, अर्बन बँका व सहकारी पतसंस्था यांनी भरलेली स्टॅम्प ड्यूटी व त्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मधुकर निवासराव पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांनी अत्यंत व्यापक स्वरूपाची व सरसकट माहिती मागितली आहे. तसेच काही मुद्दयांमध्ये खुलाशाची मागणी केली आहे. त्यांनी मागणी केली आहे तशी एकत्रित स्वरूपात माहिती ठेवली जात नाही व संकलित करून एवढी विस्तृत माहिती देणे शक्य नाही. मुद्देनिहाय उत्तर त्यांना देण्यात आले आहे. देऊ केलेल्या माहितीसाठीचे कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. विशिष्ट संस्थेची मागणी केल्यास तशी माहिती देणे शक्य आहे अथवा अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती त्यांनी घ्याव्यात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर, जि.सांगली श्री.जे.पी.शिंदे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कगदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर, जि.सांगली यांनी केलेली कार्यवाही

योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार खुलाशाची मागणी 'माहिती' म्हणून करता येणार नाही. मात्र प्रश्नार्थक स्वरूपात माहितीची मागणी करता येणार नाही, हे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.सांगली यांच्या लेखी निवेदनातील म्हणणे योग्य नाही. प्रश्नार्थक म्हणून माहिती नाकारता येणार नाही. खुलासा, अभिप्राय अशा स्वरूपाची मागणी करणारी विचारणा असल्यासच ती 'माहिती' म्हणून देय ठरणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सचिन बाळासो करांडे
मु.पो.उदगांव, ता.शिरोळ,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट व रिसर्च सेंटर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट व रिसर्च सेंटर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४३/२००९/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०५/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०६/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाविद्यालयात कामावर रुजू झाल्यापासून प्रत्येक महिन्याचे व वर्षाच्या पगार पत्रकाची छायाप्रत | |

**विवेचन**

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक व

इतर मदत, निधी, तसेच वेतन अथवा वेतनेतर अनुदान मिळत नाही. तसेच कॉलेजला शासनाकडून जमीन मिळालेली नाही, असे चेअरमन डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट आणि रिसर्च सेंटर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दि.६/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केलेले आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 8 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर १९,
कोयनानगर, चिंचवड,
पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उद्यान-स्थापत्य),**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४५/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 22 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर गंगाधर सोपल
सोपल बंगला, आगळगाव रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी विहित मुदतीत दिली नाही. सात वर्षांची माहिती संकलित करण्यास अतिरिक्त दोन महिन्यांचा कालावधी लागेल, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी दि.१२.२.२००८ च्या पत्रान्वये आपल्याला कळविले. तसेच खडी, क्रशर व दगड-खाणीबाबतच्या पुराव्याची माहिती जिल्हाधिकारी, सोलापूर, गौण खनिज शाखा यांच्याकडून उपलब्ध होईल, असे कळविले. दि.२०.१२.२००७ रोजी प्राप्त झालेल्या अर्जाला दि.१२.२.२००८ रोजी त्यांनी उत्तर दिले. एवढ्या विलंबाच्या कालावधीसाठी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर दंडास पात्र आहेत, असे अभिप्राय अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी अपिलाच्या निर्णयात नोंदविले व १५ दिवसात माहिती निःशुल्क देण्याचे आदेश दिले. मात्र माहिती अपूर्ण मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुधीर गंगाधर सोपल यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविली असून. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात केवळ दोन व्यक्तींच्या आडनावाचा उल्लेख केला होता. पूर्ण नाव आदी तपशील दिला नव्हता. हा तपशील त्यांच्याकडून घेतल्यानंतर त्यांना माहिती दिली, तशी

पोहोच त्यांच्या वतीने त्यांच्या चिरंजीवांनी दि.२५.३.२००८ रोजी दिली आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.आर.डी.नवले यांनी आयोगाला दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाशात नमूद केले आहे. माहिती तयार असल्याचे श्री.दराडे यांनी दि.२५.३.२००८ रोजी श्री.सोपल यांना कळविले. तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेनंतर ठरलेली अतिरिक्त माहिती तयार असल्याचे दि.२२.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले व अपीलकर्त्यांनी दि.२४.११.२००८ रोजी माहिती घेतली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संदिग्ध स्वरूप व नेमक्या तपशिलाचा अभाव लक्षात घेता माहिती विहित मुदतीत न देण्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांना पूर्णपणे जबाबदार धरता येणार नाही. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी शास्तीबाबत निर्णयात नमूद करूनही व १५ दिवसांची मुदत दिली असतानाही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे यांनी दि.२५.३.२००८ पर्यंत माहितीबाबत कार्यवाही केलेली नाही. त्यांनी दिलेली माहिती पाहता संकलनासाठी अतिरिक्त दोन महिन्याचा कालावधी लागण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्त्याचा मूळ अर्ज दि.१९.११.२००७ चा असून दि.१२.२.२००८ रोजी उत्तर दिले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी निर्णयात नमूद केलेला अभिप्राय लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेला तीस दिवसांचा कालावधी वगळता उत्तराला ४६ दिवस विलंब झालेला आहे. त्याबद्दल श्री.दराडे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे यांना मूळ अर्जाला उत्तर देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल (४६ दिवसXप्रतिनिदन रूपये २५०=रुपये ११,५००/-) रूपये ११,५००/- शास्ती करण्यात येत आहे. श्री.बी.के.दराडे हे सेवानिवृत्त झाले असतील तर त्यांच्या जून २०१०, जुलै २०१० व ऑगस्ट २०१० या महिन्यांच्या अनुक्रमे जुलै २०१०, ऑगस्ट २०१० व सप्टेंबर २०१० मध्ये मिळणाऱ्या निवृत्तीवेतनातून तीन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी करावी व त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010